
# भावार्थ ज्ञानेश्वरी

(२१ व्या शतकासाठी)

अध्याय बारावा

सुलभ ओवीबद्ध रचना



विजय बळवंत पांढरे B.E. (Civil)

ई-आवृत्ती

साहित्य प्रतिष्ठान®

भावार्थ ज्ञानेश्वरी(२१व्या शतकासाठी)

अध्याय बारावा

मूळ लेखन : संत श्री ज्ञानेश्वर (इ.स. १२९१)

२१व्या शतकातील मराठीत ओवीबद्ध रुपांतर (इ.स. २०१०):

श्री विजय पांढरे

मु पो लाखनवाडा,

ता. खामगांव,

जि बुलढाणा. महाराष्ट्र.

9822992578

vbpandhare@gmail.com

ई प्रकाशन :

ई साहित्य प्रतिष्ठान®

9869674820

esahity@gmailcom

www.esahity.com

E Sahity Pratishthan

Eleventh floor(G1102)

Eternity

Eastern Express Highway

Thane, Maharashtra. 400604

मुखपृष्ठ रचना : श्री जावेद शेख

©श्री विजय पांढरे(२०१२)

**या पुस्तकाची प्रिंट स्वरुपातील आवृत्ती मुकुंदराज महाराज संस्थान यांनी प्रकाशित केली असून ती ३९०/- रुपयांना उपलब्ध आहे.**

प्रस्तुत ई आवृत्ती ही विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध असून कोणीही आपल्या वेबसाईट्वर डाऊनलोडसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यास प्रकाशकांची कोणतीही हरकत नाही. या पुस्तकाची ई आवृत्ती प्रत्येक मराठी माणसाच्या डेस्कटॉपवर असावी हे आमचे ध्येय असून त्यासाठी **प्रत्येक मराठी माणसाचे सहकार्य अपेक्षित आहे.**

# ॥ ज्ञानेश्वरी ई पारायण अभियान ॥

जगातील सर्वोत्कृष्ट ग्रंथांपैकी श्री ज्ञानेश्वरी हा ग्रंथ आहे. त्यात परमार्थ तर आहेच. पण परमार्थाची खरी सुरूवात मनुष्य जन्म उत्कृष्टपणे जगण्यातून होते. कसे जगावे याचे उत्कृष्ट विवेचन सुंदर रितीने ज्ञानेश्वरीत केले आहे. प्रत्येक मराठी माणसाने वाचलेच पाहिजेत असे ग्रंथ म्हणजे छत्रपती शिवरायांचे चरित्र आणि श्री ज्ञानेश्वरी. पण ज्ञानेश्वरी प्रत्येक मराठी माणूस वाचतोच असे नाही. कारण १२९१ साली प्रचलित असलेल्या प्राकृतबहुल मराठीत लिहीलेली ज्ञानेश्वरी आजच्या तरुणांना समजायला कठीण जाते. अनेकजण प्रयत्न करतात पण नंतर सोडून देतात. कारण प्राकृत भाषा आजच्या तरूणाच्या ओळखीची राहिलेली नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठान सादर करीत आहे २१व्या शतकातील सोप्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरी. श्री विजय पांढरे यांनी अत्यंत सोप्या भाषेत आणि २१व्या शतकातील तरुणांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरीचे केलेले रुपांतर आपल्याला आवडेलच. कारण मूळ ज्ञानेश्वरीतील गोडवा त्यांनी जसाचा तसा जपला आहे. रोज केवळ अर्धा तास, असे फ़क्त एकोणतीस दिवस वाचन करून आपण ज्ञानेश्वरीचे पूर्ण पारायण करू शकता. श्री विजय पांढरे लिखित २१व्या शतकासाठी सध्याच्या मराठीत ओवीबद्ध केलेली भावार्थ ज्ञानेश्वरीची भॆट आम्ही आज ई साहित्य प्रतिष्ठानच्या व्यासपीठावरून सादर करीत आहोत. ही ज्ञानेश्वरी मूळ ज्ञानेश्वरीप्रमाणेच ओवीबद्ध असून समजायला खूपच सोपी झाली आहे. मूळ प्राकृत ज्ञानेश्वरीइतकीच रसाळ. या ज्ञानेश्वरी सोबत मूळ ज्ञानेश्वरीचीही ई प्रत विनामूल्य उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी व अभियानात सामिल होण्यासाठी खालील लिंक्सना भेट द्या.

www.esahity.com
http://www.facebook.com/edyaneshwari
http://edyaneshwari.blogspot.in/
http://youtu.be/yCHZ85Xzuxc

|| ॐ परमात्मने नम: ||

## अध्याय बारावा

# भक्तियोग

जय जय श्री भगवंता । उदार प्रसिद्ध अनंता । अखंड आनंदाची वार्ता । तुझे कारणे ||१||
विषय सर्प डसता । येते ती मूर्च्छता । परि कृपादृष्टी तुझी पडता । येतसे शुद्ध ||२||
तुझा प्रसाद लाभता । न पोळते ती दु:खता । आणि न जाळते ती व्यथा । भगवंता कधी ||३||
योगसुखाचे सोहळे । सेवका तुझेनि स्नेहाळे । सोऽहंसिद्धिचे लळे । पुरवतोस तू ||४||
कुंडलिनी ते जागवून । ह्रदयाकाशी प्रकटून । देशी शिष्यासी ज्ञान । भगवंता तू ||५||
आत्मज्योती प्रकटवून । मन पवना स्थिर करून । आत्मसुखाचं लेणं । लेववितोस तू ||६||
अनाहताचा ध्वनी ऐकवून । आत्मज्ञान ते प्रकटवून । समाधीसुखाचं ते भेटणं । तुझ्याच मुळे ||७||
साधकांची तू माऊली । सकळ विद्या तुझ्या पाऊली । म्हणून तुझी ती सावली । सोडीन न कधी ||८||
तुझी कृपादृष्टी लाभता । तुझे कारुण्य प्रकटता । मग सकल विद्यांचा तो राबता । होय तेथे ||९||
म्हणोनी अंबे श्रीमंते । भक्तजन कल्पलते । द्यावी आज्ञा माते । ग्रंथ निरूपणाची ||१०||
त्या नवरस सागरातून । काढून ते आत्मज्ञान रत्न । भावार्थाचं प्रकटन । होवो येथे ||११||
साहित्य सोन्याच्या खाणीतून । प्रकटू दे देशी बोलीतून । शब्द ते विवेकसंपन्न । आज येथे ||१२||
कृष्णार्जुन संवादातून । कर रहस्याचे उद्‌घाटन । आत्मज्ञान ते गहन । प्रकटो येथे ||१३||
करून पाखंडाचे खंडन । वादविवाद तो मोडून । कुतर्कांची जाळे तोडून । प्रकटावे आज ||१४||
प्रकटवून ते अवधान । कर भगवंत गुणांचे वर्णन । श्रोत्यांना त्या श्रवण । घडो आज ||१५||
मऱ्हाठीचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळू करी । सर्वांठायी ज्ञानाची उजरी । करावी आज ||१६||
तुझ्या स्नेहाचा पदर । जर पांघरशील माझ्यावर । तरच ज्ञानाचे भांडार । उघडेल येथे ||१७||
ऐसे ते बोलून । श्रीगुरूकडे पाहिलं ज्ञानदेवानं । ते म्हणे बोलणे अधिक सोडून । सांगावा गीतार्थ ||१८||
मग जी जी म्हणत ज्ञानदेवानं । जे सुरू केले निरूपण । ते देऊन तुम्ही अवधान । ऐकावे आता ||१९||

### अर्जुन उवाच

जो सकळवीरांचा अधिराज । सोमवंशीचा विजयध्वज । तो बोलता जाहला आत्मज । पांडू राजाचा ||२०||
अर्जुनाने कृष्णास म्हणितले । आपण विश्वरूप मज दाविले । ते पाहुनी चित्त भ्याले । भगवंता माझे ||२१||
सगुण कृष्णमूर्तीच्या ठिकाणी । माझी आवड ती पाहुनी । ते योग्य नाही असे भगवंतांनी । म्हटले होते ||२२||
तरी व्यक्त आणि अव्यक्त । तूचि असे एक निभ्रांत । भक्तिद्वारे भेटते ते व्यक्त । आणि योगे अव्यक्त ||२३||
दोन्हीही त्या वाटेने । घडे तुजसीच पावणे । व्यक्त अव्यक्ताच्या दोन्ही दाराने । भेट तुझी ||२४||
कस जो सोन्याच्या लगडीत असे ।तोच गुंजभर सोन्यात वसे । परिछिन्न व्यापक तैसे । एक की ||२५||
अमृताच्या त्या सागरात । जे सामर्थ्य असे वसत । तेच असे अमृत थेंबात । लहान जरी ||२६||
हे सर्व असे मी जाणत । परि शंका एक मनात । ती असे मी तुज विचारीत । भगवंता आता ||२७||
दाविली जी मज भगवंता । आपली ती विश्वव्यापकता । ती सत्य की असत्यता । सांग मजला ||२८||
जे तुझे भक्त असती । ते तुजसाठीच कर्म करती । तुझीच सदैव ती वस्ती । तयाच्या मनी ||२९||



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मानुनी हरिहरादि नाना । ते करती तुझी उपासना । तुला धरुनी अंत:करणा । राहती सदा ॥३०॥
जे असतात बा ज्ञानी । ते रमती पहा निर्गुणी । ते चारी वाचा संपवूनी । पावती तुजला ॥३१॥
ज्ञानी अव्यक्त उपासतात । जे असे देशकालरहित । आणि तूच होऊन जातात । ज्ञान होता ॥३२॥
हा भक्त आणि ज्ञानी तो । यातील कोण तुला जाणतो । योग कुणासी घडतो । सांग मजला ॥३३॥
या अर्जुनाचिया बोला । भगवंत मनी संतोषला । म्हणे केलास प्रश्न चांगला । अर्जुना तू ॥३४॥

श्री भगवानुवाच

सूर्याचा होता अस्त । किरणेही तयामागेच जातात । तैसे मज अर्पूनी शरीर मन समस्त । भजावे मजसी ॥३५॥
जसे त्या पावसाळ्यात । नदी तुडुंब असे वाहत । तैसे खूप श्रद्धेने भजतात । भक्त माझे ॥३६॥
गंगा प्रवेशता सागरात । मागून लोंढेच्या लोंढे येतात । तसा प्रेमभाव असे दाटत । हृदयी त्यांच्या ॥३७॥
सर्वेंद्रिय मजसी अर्पून । जे गाती माझे गुणगान । रात्र व दिवस विसरून । सदोदित ॥३८॥
ऐसे जे भक्त । जे स्वत:स मजसी अर्पितात । तयांनाच मी योगयुक्त । मानतो अर्जुना ॥३९॥
आणि जे असतात ज्ञानी । ते सोऽहम् साधना करुनी । स्वप्न सुषुप्तीसी ओलांडूनी । जाती ते ॥४०॥
तेथे मनाचे काही न चालते । तेथे बुद्धि कधी न पोहचते । तया इंद्रिये कधी ते । जाणतीच ना ॥४१॥
शरीर मनासी तादात्म्य तुटता । स्वप्न सुषुप्ति ओलांडता । अहंभाव तो विरता । प्रकटते ते ॥४२॥
जे सर्वत्र करीतसे वास । जयाकारणे विश्वाचा आभास । परि मनइंद्रिय विचारास । अप्राप्त ते ॥४३॥
तयासी शोधू जाता । ते सापडेच ना तत्त्वत: । कोणताही विधी अवलंबिता । न प्राप्ती त्याची ॥४४॥
जे चळे ना ढळे । कधीच सरे ना मळे । ते करूनी अहंभावाचे वाटोळे । जाणले त्यांनी ॥४५॥
वैराग्य अग्नी पेटवून । मनइंद्रियांसी तादात्म्य तोडून । सर्व कल्पना त्या सांडून । ते मुक्त होती ॥४६॥
मनी संयम धरणे । इंद्रियसुखांना लाथाडणे । मन निर्विकल्प करणे । सूत्र अर्जुना ॥४७॥
द्वार लावूनी अपानीचे । सहाय्य घेऊन आसनमुद्रांचे । अभ्यास पहा मूळबंधाचे । करताती ते ॥४८॥
आशेचे पाश तोडून । संयमाचे बुरूज उभारून । अज्ञान निद्रेस ओलांडून । मुक्त व्हावे ॥४९॥
वज्रासनात बसून । अपानासी जाळून । सप्तधातूसी शुद्ध करून । घ्यावे अर्जुना ॥५०॥
होता कुंडलिनी जागरण । जागते शक्ती मूलाधारापासून । आणि सप्तचक्रासी ओलांडणं । सूत्र अर्जुना ॥५१॥
नऊ द्वारे बंद करून । संयमाचा झेंडा उभारून । सहस्त्रारास ओलांडून । ते ज्ञानी होती ॥५२॥
अहंभाव तो त्यागून । संकल्पाचा मेंढा मारून । मनइच्छांना संपवून । ज्ञानी व्हावे ॥५३॥
इडा पिंगळा एकत्र करून । सुषुम्नी मार्गे प्रवास करून । अनाहताचे प्रकटन । अनुभवती ते ॥५४॥
होणे कुंडलिनी जागरण । सातही चक्रास ओलांडणं । आणि ब्रह्ममय होऊन जाणं । सूत्र आहे ॥५५॥
ऐसे द्वैत ते संपवून । ते स्वयेचि होती गगन । तेच बा ब्रह्मज्ञान । अर्जुना माझ्या ॥५६॥
सतत समबुद्धि होऊन । सोऽहं साधनेस ओलांडून । ते जातात ब्रह्ममय होऊन । अंतरंगी ॥५७॥
ऐसे स्वत:स संपवणे । गगनी एकरूप होणे । तेच मजसी जाणणे । आहे अर्जुना ॥५८॥
अशा त्या योगमार्गानं । माझीच प्राप्ती होणं । परि अत्यंत कष्ट भोगणं । आहे तेथे ॥५९॥
ऐसे भक्तीवाचून । चालती जे योगमार्गानं । तया नशिबी कष्ट भोगणं । आहे अर्जुना ॥६०॥
इंद्रपदाचं ते प्रलोभन । आणि ऋद्धिसिद्धीचं भेटणं । आहे बा त्या वाटेनं । नक्कीच तेथे ॥६१॥
कामक्रोधादिक विकार । भेटती तेथे अपार । जाणे तयांच्या पार । सोपे नाही ॥६२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

तहानेठायीच तहान पिणे । भुकेठायी भुकेस खाणे । अहोरात्र सजग रहाणे । आहे तेथे ॥६३॥
जेथे जागणे तेच निजणे । निरोधणे तेच इंद्रियांचे भोगणे । सर्वत्र सम रहाणे । सूत्र आहे ॥६४॥
थंडीच ती नेसावी । आणि उष्णता पांघरावी । लागे वृष्टीमाजी करावी । वस्ती तेथे ॥६५॥
जसं नवऱ्यावाचून । सती ते जाणं । तितका योग हा कठीण । आहे अर्जुना ॥६६॥
येथे नाही नवऱ्याचा पत्ता । बापही न दिसे पाहू जाता । आहे मृत्यूची ती कथा । क्षणोक्षणी ॥६७॥
योग मृत्यूहून कठीण । जसं कढत विषच पिणं । डोंगर गिळताना मुख फाटणं । नक्कीच आहे ॥६८॥
म्हणोनि योगाचिया वाटा । जे निगाले गा सुभटा । नशिबी दु:खाचाच वाटा । आला त्यांच्या ॥६९॥
जैसे लोखंडाचे ते चणे । बोचऱ्या पडे खाणे । ते पोट भरणे कि मरणे । सांग अर्जुना ॥७०॥
केवळ हाताचा उपयोग करून । समुद्र ते तरून जाणं । आणि गगनी ते चालणं । अशक्य जसं ॥७१॥
युद्धात भाग ते घेणं । आणि जखमी न होणं । अथवा सूर्यावर ते चालणं । अशक्य की ॥७२॥
जसे त्या पांगळ्याने । वायुसी स्पर्धा करणे । तसे ब्रह्म होणे देहधाऱ्याने । कठीण अर्जुना ॥७३॥
असे सारे असून । जे करू पाहती प्रयत्न । तया घडे दु:ख भोगणं । प्रयत्न करता ॥७४॥
बघ त्या भक्तांना पार्था । न पडे भोगणे ऐसी व्यथा । जे भक्तिचिया पंथा । लागले असती ॥७५॥
कर्मेंद्रिये तयांची । पाळिती आज्ञा पूर्वकर्मांची । पूर्वकर्मानुरूपच कर्मे तयांची । होतात अर्जुना ॥७६॥
योग्य ते करणे । आणि अयोग्य ते टाळणे । मग होत असे पहा संपणे । पूर्वकर्मांचे ॥७७॥
<u>ऐसे कर्मासी जाणून । निष्काम कर्म करणं । तेच कर्मबंधाचं संपणं । आहे अर्जुना</u> ॥७८॥
अजून एक तयांचा गुण । ते काया वाचा मनानं । करती सदैव माझे चिंतन । अहोरात्र ॥७९॥
ऐसे जे मजसाठी तत्पर । उपासना करती निरंतर । मग ते माझेच घर । होऊनी जाती ॥८०॥
माझ्या आवडीकारणे । तयानी स्वर्ग मोक्ष त्यागणे । आणि मजसी भजणे । निरंतर ॥८१॥
ऐसे अनन्यभावानं । जे करती माझे पूजन । तयांच्या इच्छा पूर्ण करणं । कर्तव्य माझे ॥८२॥
हे पहा धनुर्धरा । जो जन्म घेई मातेच्या उदरा । तो मातेसी सोयरा । असतोच ना ॥८३॥
तैसे रंगता माझ्या भक्तीत । मी असे सर्वांना स्वीकारत । आणि घेऊन पहा पदरात । उद्धरतो तया ॥८४॥
एऱ्हवी तरी माझीया भक्ता । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ॥८५॥
तसै भक्तांना माझे मानून । हित तयांचे जाणून । तयांचे पहा कल्याण । करीतसे मी ॥८६॥
जन्ममृत्यूसी पाहून । पहा जाती ते घाबरून । तयांचं भय घालवणं । कर्तव्य माझे ॥८७॥
तया भक्तिमार्ग दाखवून । या भवसिंधुतून तारून । करीतसे तयांचे रक्षण । अर्जुना मी ॥८८॥
करण्या तया मदत । वारंवार असे मी अवतरत । रामकृष्ण समस्त । अवतार माझे ॥८९॥
अनेक विविध नावांनी । पृथ्वीवरी जन्म घेऊनी । भक्तांच्या त्या रक्षणी । अवतरतो मी ॥९०॥
जयांचे इंद्रियभोग सुटले । तया ध्यान मी शिकवले । आणि जे इंद्रियभोगात अडकले । तया दिले नाम ॥९१॥
ऐसी ती प्रेमाची पेटी । बांधली बा सर्वांच्या पोटी । आणि आणतो तया तटी । सायुज्याच्या ॥९२॥
या माझ्या सर्व भक्तांस । देऊनी नामाचे बक्षीस । घेऊन जातो मी वैकुंठास ।अनायासे ॥९३॥
माझ्या भक्तांना काही । चिंतेचे नाव नाही । सर्वांना मी तारून नेई । भवचक्रातून ॥९४॥
पहा जेधवा जे भक्त । मज वसवती अंत:करणात । मग धावणे तयांच्या संकटात । कर्तव्य माझे ॥९५॥
म्हणून तू अर्जुना । पक्के ठेव हे ध्याना । माझिया भक्तिविना । पर्याय नाही ॥९६॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

अर्जुना तुझे मन । मजसी एकरूप करून । जाऊ दे बा संपून । बुद्धि निश्चयाला ||९७||
मन बुद्धि निश्चय संपता । प्रकटते ती ब्रह्ममयता । मग तुझी माझी एकता । अनादिच ||९८||
जेधवा मन बुद्धि संपते । तेधवा आत्मतत्त्व प्रकटते । हे ज्ञानाचे सूत्र ते । जाण अर्जुना ||९९||
सूर्य तो मावळता । संपते ती प्रकाशता । तैसे मनबुद्धि संपता । संपते द्वैत ||१००||
जेधवा जीव शरीर सोडतो । तो इंद्रियेही सोबत नेतो । तैसे अहंकार संपतो । संपता मनबुध्दि ||१०१||
ऐसे मन बुद्धि विरता । घडे आत्मतत्त्वी एकरुपता । मग तू आणि विश्वात्मकता । भिन्न नाही ||१०२||
माझ्या या वचना । अपवाद नाही अर्जुना । संपू दे त्या मना । होण्या ज्ञान ||१०३||
जर तुझे चित्त । नसेल मजठायी स्थिर होत । तर माझे नाम जपत । कर स्थिर त्याला ||१०४||
थोडासा वेळ काढून । करत जा तू माझे स्मरण । मग मनाचं स्थिर होणं । घडेल अर्जुना ||१०५||
माझे नाम ते घेता । मनी प्रकटते ती शांतता । मग विषयामाजी अनासक्तता । वाढेल तुझी ||१०६||
होता शरदाचे आगमन । नदी जातसे ओसरून । तसे चित्त मग प्रपंचातून । निघेल तुझे ||१०७||
पौर्णिमेनंतर जैसे । शशीबिंब ते आटत असे । मग शेवटी हारपून जात असे । अमावास्या येता ||१०८||
तैसे चित्त मजठायी ठेवता । संपते विषयांची आसक्तता । हळूहळू मग पंडुसुता । मीच होसी ||१०९||
हा अभ्यास असे कामाचा । येता वीट तुला विषयाचा । मार्ग माझ्या भेटीचा । गवसेल तुजला ||११०||
अभ्यास तो करता । आकाशातही येते उडता । शक्य वाघ सापांशी मित्रता । अभ्यासानेच ||१११||
समुद्रावर ते चालणे । विषाला ते पचवणे । वेद मुखोद्‌गत होणे । अभ्यासानेच ||११२||
अभ्यास तो करता । होते सर्व गोष्टींची प्राप्तता । अंतरी समज ती येता । भेट माझी ||११३||
जर चित्त तुझे नसे अभ्यासी । तरी न प्राप्त होता उद्वेगासी । कृती मी सांगतो तशी । कर अर्जुना ||११४||
इंद्रिया न कोंडी । भोगासी न सोडी । अभिमान न तोडी । स्वजातीचा ||११५||
कुलधर्म ते आचरून । विधिनिषेध पाळून । सर्व सुखे भोगून । मुक्ती आहे ||११६||
पण हे सर्व करताना । सोडून दे तू अभिमाना । अर्जुना सर्व या कर्म घटना । तुझ्या नाही ||११७||
करणे का न करणे । हे अवघे तोचि जाणे । या विश्वाचे ते चालणे । ईश्वरा कारणे ||११८||
तुलना न करता । दोष न लावता । घडू दे ती कर्मठता । त्या कर्मांठायी ||११९||
जसे त्या माळ्याने नेले । पाणी तसे निवांतची गेले । हे पाण्याने जसे केले । तसे कर अर्जुना ||१२०||
चांगला का खडबडीत । रथ असे का कधी विचारीत । ऐसी समत्वाची रीत । साधना अर्जुना ||१२१||
सोडून प्रवृत्ति आणि निवृत्ती । सम ठेवून ती चित्तवृत्ती । अखंड सजगता ती । असावी बा मनी ||१२२||
जी जी घडेल कर्मठता । तिला चांगले वाईट न म्हणता । सर्व कर्म मजसी अर्पिता । मोक्ष घडे ||१२३||
ऐशा या समत्वाने । होईल जयाचे जगणे मरणे । घडे तयाचे आपोआप येणे । मजठायी अर्जुना ||१२४||
जर न जमेल हे तुज । न देऊ शकशील कर्म मज । तरी गा तू भज । मजसी अर्जुना ||१२५||
बुद्धीच्या पाठी पोटी । कर्माच्या आदि शेवटी । मज स्मरणे किरटी । जर कठीण तुजला ||१२६||
तर माझाही नाद सोड । पण मनी असू दे समत्वाची चाड । फुलता कर्म समत्वाचे झाड । प्राप्ती माझी ||१२७||
आणि ज्या ज्या वेळेस । फळे लागतील कर्मास । तू त्या त्या वेळेस । त्याग तयांना ||१२८||
जैसे आपल्याच त्या फळांना । वृक्षवेली चाखतीच ना । तैसे बा कर्मफळांना । न चाखावे कधी ||१२९||
इच्छा मजसी पावण्याची । वा माझ्या सायुज्यतेची । ठरते ती बा अडचणीची । प्रकटनास माझ्या ||१३०||


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

खडकावर पावसाने वर्षावे । की आगीत बीज पेरावे । तैसे असावे कर्म आघवे । इच्छारहित ॥१३१॥
जसे आपल्या कन्येठायी । नसे कोणीच बा विषयी । तैसे या सर्व कर्मापायी । निष्काम व्हावे ॥१३२॥
आगीची ज्वाला जैसी । वाया जाय आकाशी । क्रिया जिरू दे तैसी । शून्यामाजी ॥१३३॥
ऐसा फलत्याग करणं । वाटेल तुला अर्थहीन । पण मार्ग श्रेष्ठ हाच सर्वाहून । जो योग अर्जुना ॥१३४॥
ऐसे फलत्याग घडता । संपते ती कर्मसंस्कारता । जैसे फुलोरा तो येता । संपे बांबू झाड ॥१३५॥
तैसे कर्मफल त्यागून । जाऊ द्यावे कर्म संपून । मग जन्ममरणाचं रहाटणं । खुंटून जाई ॥१३६॥
ऐसे अभ्यास तो करता । प्रकटते ती ब्रह्ममयता । जन्ममरणाची ती कथा । संपून जाई ॥१३७॥
ऐसे आत्मतत्त्वी एकरूप होता । तुटते इंद्रिय मनासी तादात्मता । मग संस्कारांची ती व्यथा । नष्ट होई ॥१३८॥
ऐसे कर्मसंस्कार संपता । प्रकटते ती निष्कामता । मन निष्काम होता । प्रकटे शांति ॥१३९॥
मनी प्रकटण्या शांति । हाच क्रम बा सुभद्रापती । म्हणून अभ्यासाची महती । सांगितली तुजला ॥१४०॥
करणे ग्रंथाचे वाचन । ते असे बा शब्दज्ञान । शब्दज्ञानाहून ध्यान । महत्त्वाचे अर्जुना ॥१४१॥
जया म्हणती ध्यान । तेच बा कर्मफल त्यागणं । फलत्यागात शांति प्रकटन । आहे अर्जुना ॥१४२॥
ऐसे कर्मफल त्यागता । प्रकटते ती निष्कामता । आणि निष्कामतेत शांतता । ठेवली असे ॥१४३॥
मग सर्व भुतांच्या ठायी । द्वेषाचे नाव नाही । आपपर भाव तोही । नाही कोठे ॥१४४॥
उत्तमाते धरिजे । अधमाते अव्हेरिजे । हे काहीच नेणिजे । पृथ्वी जेवी ॥१४५॥
श्रीमंता देईल जीवन । आणि गरिबा मी मारीन । हे जसे नसे म्हणणं । वायूचं अर्जुना ॥१४६॥
गायीची तहान भागवीन । वाघा विष होऊन मारीन । असं का कधी पाण्यानं । म्हटलं अर्जुना ॥१४७॥
ऐसी सर्व भूतमात्रासी । मैत्री तयाची खासी । अनुभवत असे एकता विश्वासी । अंतरंगी तो ॥१४८॥
मी-तूपणाची भाषा विसरून । काहीच नसे तयाचं मागणं । मग सुखदु:खाचं अनुभवणं । संपे तेथे ॥१४९॥
अंगी दया क्षमा शांति । जैसी दयाळू पृथ्वीच ती । संतोषाची ती वस्ती । अंतरी त्याच्या ॥१५०॥
जैसा वर्षा ऋतुवाचून । सागर नित्य असे भरभरून । तैसे इंद्रियभोगावाचून । संतुष्ट हा ॥१५१॥
आत्मज्ञाना कारण । आसक्तीच जात असे संपून । असे वैराग्यपूर्ण जीवन । त्याचे अर्जुना ॥१५२॥
जीव परमात्मा दोन्ही । बैसोनी ऐक्याच्या आसनी । तयाच्या हृदयभुवनी । विराजती गा ॥१५३॥
ऐसा योग तो घडता । प्रकटते ती शांतता । मनबुद्धि मज अर्पिता । भेट माझी ॥१५४॥
ऐसा आतबाहेर योग घडता । मी-पणाचा अंत होता । मग माझी त्याची एकता । अखंडित ॥१५५॥
अर्जुना तोच गा भक्त । तोच योगी आणि मुक्त । मजसी असे तो आवडत । प्राणाहून ॥१५६॥
तो मला किती आवडतो । हे मी न सांगू शकतो । ते वर्णण्या शब्द तो । न सुचे मजला ॥१५७॥
अशी ही प्रेमाची कहाणी । न वर्णू येते ती शब्दांनी । मी आणि तो ज्ञानी । एक अर्जुना ॥१५८॥
म्हणून गा आम्हा । वेगा आली उपमा । एऱ्हवी काय प्रेमा । वर्णिता ये कधी ॥१५९॥
येते दुप्पट ती भरती । सांगता प्रियतमाची ख्याती । ही प्रेमाची ती जाती । ऐसीच आहे ॥१६०॥
मग अशा या समयाला । जर कोणी ऐकणारा भेटला । मग अवीट त्या वर्णनाला । सीमाच नुरे ॥१६१॥
म्हणोनी गा पांडुसुता । तूच प्रिय आणि तूच श्रोता । म्हणून प्रेमाची ही वार्ता । घडली येथे ॥१६२॥
भक्तांच्या त्या वर्णनात । मी असे सुखात डुंबत । भगवंत ऐसे म्हणत । डोलू लागले ॥१६३॥
आता अर्जुना तू जाण । त्या भक्ताचे लक्षण । जया मी अंत:करण । दिधले असे ॥१६४॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

येता सागरा ती भरती । जलचरा न वाटते भीती । कधी उबगतो का जलचराप्रति । सागर अर्जुना ॥१६५॥
जग जरी झाले उन्मत्त । तया न वाटे काही खंत । तया नसे कधी होत । त्रास त्यांचा ॥१६६॥
शरीर कधी पांडवा । कंटाळते का अवयवा । तसा तो इतर जीवा । न उबगे कधी ॥१६७॥
जगचि देह झाले । म्हणून प्रिय अप्रिय संपले । हर्ष क्रोध कधीच गेले । संपून त्याचे ॥१६८॥
ऐसे द्वंद्व निर्मुक्त । आसक्ती द्वेषरहित । असती माझे भक्त । माझीया ठायी ॥१६९॥
पडे मजसी मोह त्यांचा । जे भाग असती माझ्या जीवाचा । संबंध आहे अंतरीचा । आमचा अर्जुना ॥१७०॥
मनुष्य जन्मा येऊन । जाहला तो परिपूर्ण । ब्रह्ममयता अनुभवून । मोक्ष पावे ॥१७१॥
जयाच्या त्या मनातून । इच्छाच गेल्या निघून । तेथे सुखाचं ते नांदणं । अनिवार्य की ॥१७२॥
काशीसी ते जाणे । आणि  मोक्ष तो पावणे । परि शरीर ते त्यागणे । पडे तेथे ॥१७३॥
हिमालयी ते जाणे । आणि दोषमुक्त होणे । परि मृत्यूचा धोका असणे । आहे तेथे ॥१७४॥
गंगेसी ते नहाणे । आणि पापमुक्त होणे । परि तेथे बुडणे । असे अर्जुना ॥१७५॥
भक्तीची खोली न जाणती । परि भक्तिकारणे उद्धरती । भक्त ऐसे मोक्ष पावती । न मरता अर्जुना ॥१७६॥
संताच्याच त्या कृपेने । गंगेने पाप ते धुणे । त्या संतसंगाकारणे । शुद्धि अनंत ॥१७७॥
ऐसे असती माझे भक्त । ज्यामुळे तीर्थे पावती शुचित्व । पापाची ती वाताहत । तयाचे कारणे ॥१७८॥
शुद्धता आत बाहेर । सूर्यासारखी प्रखर । आत्मतत्त्वाचा विचार । सदैव तेथे ॥१७९॥
व्यापक आणि उदास । जैसे का आकाश । तैसे तयाचे मानस । सर्वत्र गा ॥१८०॥
संसारव्यथे फिटला । जो निराशेतून तुटला । पारध्या हातून सुटला । पक्षी जैसा ॥१८१॥
तयाचा सुखात सतत वास । मनी नाही कशाचाही त्रास । जसे त्या मुडद्यास । लाज नाही ॥१८२॥
जरी कर्म घडे तयाठायी । तया अहंकार जराही नाही । जैसा  अग्नी विझून जाई । इंधनाविना ॥१८३॥
तैसे कर्मसंस्कार संपता । प्रकटते अंतरी शांतता । शांततेत मग मुक्तता । ठेवली असे ॥१८४॥
ऐसे ब्रह्ममय होता । संपते ती द्वैतता । मग विश्वासी एकरुपता । उरे तेथे ॥१८५॥
मग भक्ती सुखालागी । स्वत:स विभागून दोन भागी । भक्त होऊनी अंगी । भक्ती करी ॥१८६॥
एकाला तो देव म्हणतो । स्वत: तो भक्त बनतो । आणि जो न भजतो । त्यासी योग देतो ॥१८७॥
तयाचे आम्हा व्यसन । आमचे तो निजध्यान । आणि किंबहुना समाधान । तोचि झाला ॥१८८॥
तयासाठी माझे रूप घेणे । तयाकारणे माझे येथे असणे । मी जीवप्राण ओवाळून टाकणे । तयासाठी ॥१८९॥
आत्मतत्त्वाचे होता प्रकटन । सर्व इच्छाच जाती संपून । मग कोणत्याही विषयाकारण । न हर्षे तो ॥१९०॥
आपणचि विश्व झाला । मनीचा भेदभाव गेला । ऐसा रागद्वेषरहित झाला । भक्त माझा ॥१९१॥
जाणून स्वत:स आत्मतत्त्व । जे कल्पांतीही नसे नष्ट होत । मग सुखदु:खाची ती बात । न उरे तेथे ॥१९२॥
तेथे दुसरा उरत नाही । स्वत:च जो विश्व होई । तया आकांक्षा काही । उरे कैसे ॥१९३॥
चांगल्या वाईटाची गोष्ट । तेथे नाहीच काही उरत । जशी दिवस रात्रीची खंत । नाही  सूर्या ॥१९४॥
ऐसा स्वत: बोध बनून । अंतरंगीच्या विवेकाकारणं । करीतसे तो भजन । अर्जुना माझे ॥१९५॥
तया सारखा दुसरा । आम्हा नसे कोणी सोयरा । आला जो आपुल्याचि घरा । माझीया ठायी ॥१९६॥
पार्था तयाच्या ठायी । वैषम्याची वार्ता नाही । शत्रू मित्र दोघेही । सारखे त्याला ॥१९७॥
आपल्या लोका उजेड करावा । आणि परक्या अंधार द्यावा । असा करतो का दिवा । कधी अर्जुना ॥१९८॥


For Complete Dnyaneshwari Visit :  www.esahity.com

एकाने वृक्षाची लावणी केली । दुसरा कापण्या घाव घाली । तरी दोघांनाही एकचि सावली । देतसे वृक्ष ॥१९९॥
जयाने केले पेरणे । तयासाठी गोड होणे । आणि गाळणाऱ्यासी कडू होणे । न ठाऊक उसा ॥२००॥
शत्रू मित्र ऐसी बात । तया नाहीच काही माहीत । मान अपमानाची खंत । नाही तेथे ॥२०१॥
जे तिन्ही ऋतूंत समान । ऐसा जाहला तो गगन । भेदभाव ते करणं । न ठाऊक त्यासी ॥२०२॥
दक्षिण उत्तर दोन्ही दिशेने । वाऱ्याने पर्वता धडकणे । तरी पर्वताने अचल राहणे । तैसे अर्जुना ॥२०३॥
जशी पौर्णिमेची रात । सर्वांना एकच प्रकाश असे देत । तसे सम तयाचे चित्त । सर्वांठायी ॥२०४॥
साऱ्या जगताची तहान । जशी भागते एक पाण्यानं । तसे तिन्ही लोकांना आकर्षण । त्याचे अर्जुना ॥२०५॥
ऐसे द्वैताचे बंधन तोडून । जो विश्वचि जाहला आपण । मी-तूपणाचा भाव संपून । नांदे येथे ॥२०६॥
निंदा आणि स्तुति । तया स्पर्श न करू शकती । आकाशा का कधी लागती । लेप अर्जुना ॥२०७॥
निंदा आणि स्तुति । एकच असे जयासाठी । एकत्वाने राहे जगती । अर्जुना तो ॥२०८॥
सत्य असत्य दोन्ही । जाणोनी जाहला तो मौनी । सदैव जो भोगे मनी । ब्रह्ममयता ॥२०९॥
फायद्या तोटयाचा विचार । माहीत नसे तया व्यवहार । असे मनाच्या त्या पार । वृत्ती त्याची ॥२१०॥
जैसे वायूच्या त्याठायी । स्थान एक नाही । तसे त्याला तादात्म्य कशाचेही । नसे अर्जुना ॥२११॥
जसे त्या आकाशात । वायू नित्य असे वसत । तैसे सर्व ते जगत । घर त्याचे ॥२१२॥
हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना सर्व चराचर । आपणचि झाला ॥२१३॥
असे असूनही पार्था । तया माझ्या भजनी आस्था । म्हणून तयाते मी माथा । मुकुट करी ॥२१४॥
श्रेष्ठासमोर मस्तक । नमवणे काय कौतुक । परि सेविती तिन्ही लोक । तीर्थ त्याचे ॥२१५॥
हा त्यातला प्रकार । जैसे देणे पडे आदर । जर झाला तो ईश्वर । श्री गुरू ॥२१६॥
परि हे असो आता । ईश्वरासी त्या वर्णिता । आत्मस्तुतीचा संचार होता । दोष लागे ॥२१७॥
म्हणून तसे काही । अर्जुना मी बोलत नाही । मी तयांचा भार वाही । शिरी माझ्या ॥२१८॥
जी पुरुषार्थ सिद्धी चौथी । घेऊनी आपल्या हाती । निघाला पहा भक्ती । जगासी देण्या ॥२१९॥
कैवल्याचा तो अधिकारी । मोक्षाचे वाटप करी । तरी जलाचिये परी । नम्र जैसा ॥२२०॥
म्हणून तया नमस्कारू । तयाते आम्ही मुकुट करू । तयाची टाच धरू । हृदयी आमच्या ॥२२१॥
तयाचिया गुणाची लेणी । लेववू आपलिये वाणी । तयाच्या कीर्तीची गाणी । गाऊ आम्ही ॥२२२॥
तो पहावा हे डोहाळे । म्हणूनी अचक्षुसी मज डोळे । हातातील लीलाकमळे । पूजण्या तया ॥२२३॥
जास्तीचे हात दोन । आलो पहा घेऊन । देण्या ते आलिंगन । तयाच्या अंगा ॥२२४॥
तयाच्या आवडी पायी । मी देह धरून येई । सतत पहा मी गाई । गुण त्याचे ॥२२५॥
जे ऐकती तयाचे चरित्र । ते बा आमचे मित्र । हे जरी वाटे विचित्र । पण सत्य असे ॥२२६॥
ते मजसी आवडती । जे मज भक्ता प्रशंसती । तयांची ती संगती । आवडे मजला ॥२२७॥
अर्जुना ऐसा समस्त । सांगितला भक्ती योग साद्यंत । माझ्याच त्या भेटीत । मुक्ती आहे ॥२२८॥
जो मला भेटतो । तोच मला आवडतो । तयासी मी उद्धरतो । भेट होता ॥२२९॥
जी ब्रह्ममयता मी सांगितली । ती जयांनी अनुभवली । तयासच समजली । भक्ती माझी ॥२३०॥
अनुभवता ब्रह्म एकवार । प्रकटते श्रद्धा अपार । मग श्रद्धेचा प्रचार । करे तो ज्ञानी ॥२३१॥
करी मोक्षाचे निरूपण । ब्रह्ममयता ती सांगून । पसरवी परम ज्ञान । लोकामाजी ॥२३२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

ऐसे मजसी प्रेम धरून । मला स्वत:चे सर्वस्व मानून । करती ते भजन । माझे अर्जुना ॥२३३॥
पार्था या जगी । तेच भक्त तेच योगी । उत्कंठा तयांलागी । लागे मज ॥२३४॥
तेच तीर्थ तेच क्षेत्र । जगी तेचि बा पवित्र । भक्तिकथेसी तेच मैत्र । असती अर्जुना ॥२३५॥
आम्ही करतो तयांचे ध्यान । तेच देव आणि अर्चन । गमे न तयांवाचून । मजला अर्जुना ॥२३६॥
तयांचे आम्हा व्यसन । तेच आमचे निधीनिधान । मिळते मला समाधान । भेटता ते ॥२३७॥
पै प्रेमळाची वार्ता । जे अनुवादती पांडुसुता । ते मानू परमदेवता । आपुली आम्ही ॥२३८॥
ऐसे पहा आनंदानं । म्हटलं त्या भगवंतानं । मी ऐकलं या कानानं । म्हणाला संजय ॥२३९॥
राया जो निर्मळु । निष्काम लोककृपाळु । शरणागता प्रतिपाळु । अभयदाता ॥२४०॥
जो धर्मकीर्ति धवळु । अगाध दातृत्व सरळु । अतुल बळे प्रबळु । शक्तिमान ॥२४१॥
जो पै सुरसहायशिळु । लोक लालन लिळु । प्रणत प्रतिपाळु । हा खेळ जयाचा ॥२४२॥
जो भक्तजनवत्सलू । प्रेमजन प्रांजळू । सत्यसेतू सरळू । कलानिधी ॥२४३॥
सांगे असे कृष्ण वैकुंठीचा । जो चक्रवर्ती द्वारकेचा । आणि पुत्र तो पांडुचा । ऐकत आहे ॥२४४॥
आता कथा ती पुढील । भगवंता पहा सांगतील । अध्यात्म ते समजवतील । पुन्हा आम्हा ॥२४५॥
पहा ती रसाळ कथा । मराठीत प्रकटेल आता । ज्ञान जे जाणता । कल्याण आपले ॥२४६॥
करावी सेवा श्रोत्यांची । आज्ञा आहे श्रीगुरूंची । म्हणून वाणी ज्ञानदेवाची । बोलेल आता ॥२४७॥

ॐतत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगोनाम द्वादशोऽध्याय: ॥१२॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ॥जेथे जेथे मराठी माणूस, तेथे तेथे ज्ञानेश्वरी॥

सर्वत्र वेद यज्ञाचा घाट।अन् सुविद्येचा झडझडाट। वारा सत्वगुणाचा सोसाट। वाहू लागे॥

अशी सुसाट सुगंधी वाऱ्यासारखी ज्ञानेश्वरी सर्वत्र पसरवावी. जगातील प्रत्येक मराठी माणसाने त्याचा आनंद घ्यावा व अवघे जन सुखी व्हावे अशी ज्वलंत आणि तीव्र ईच्छाशक्ती असणाऱ्या सर्व वयाच्या वाचकांनी आमच्याशी संपर्क साधावा. आपण जर अजून एकापर्यंत ही ज्ञानेश्वरी पोहोचवू शकत असलात तरी ते एक महत्त्वाचे काम होईल. सहस्त्र बाहू, लक्ष मने या कार्यात लागले तर हा गोवर्धन सहज उचलू शकतील. आपल्या संपर्कात काही प्रसार माध्यम असेल तर हे काम अधिकच सोपे होईल. आपल्या हाती जे असेल ते साधन वापरून आपण या ज्ञानियांच्या राजाच्या ज्ञानानुभवाचा प्रसार करूया.

ज्ञानेश्वर माऊलींचा संदेश सर्व जगात सुगंधासारखा पसरो आणि सर्व जीव सुखी होवोत अशी प्रार्थना करून या कामाला सुरूवात करूया.

सामिल होण्यासाठी लिहा : esahity@gmail.com

संपूर्ण ज्ञानेश्वरीसाठी भेट द्या : www.esahity.com

Facebook वर पहा : http://www.facebook.com/edyaneshwari

ब्लॉगला भेट द्या : http://edyaneshwari.blogspot.in/

या शिवाय या ज्ञानेश्वरीचे तीस तासांचे सांगीतिक पारायण उपलब्ध असून कोणाला FM Radio किंवा तत्सम प्रसार माध्यमासाठी हवे असल्यास संपर्क साधावा. हे सांगितिक ई पारायण लवकरच स्वरनेटाक्षरी या ई साहित्य प्रतिष्ठानच्या ऑडिओ वेबसाईटवर उपलब्ध होईल.

ई मेल द्वारे दर गुरूवारी एक एक भाग ई साहित्य प्रतिष्ठानच्या सव्वा लाख वाचकांना उपलब्ध केला जाणार आहेच. त्यांच्या मार्फ़त ही ज्ञानेश्वरी किमान बारा लाख मराठी माणसांपर्यंत जाणार हे तर निश्चितच.

जगातील बारा कोटी मराठी मनांपर्यंत ती पोहोचावी ! या ज्ञानयज्ञात आपण सहभागी व्हाल ना!

---

अध्यात्म विषयाचे सखोल मनन, चिंतन व मंथन करून वेशाने साधू नसलेले, पण वृत्तीने साधू असलेले ज्यांच्यावर मी खूप खूप प्रेम करतो, असे श्री विजयजी पांढरे. विजयजी यांनी 'समग्र ज्ञानेश्वर' अगदी सरळ मराठी भाषेत यावेत यासाठी दिनरजनी अथक प्रयास केला आहे. प्रथम त्यांनी 'अमृतानुभव' अगदी सोप्या व सरळ मराठीत ओवीबद्ध केला, नंतर 'चांगदेव पासष्टी' त्याचबरोबर आता श्री ज्ञानेश्वरीसारखा विशाल व ९०३४ ओव्यांनी ओतप्रोत असलेल्या ग्रंथाला ओवीबध्द करुन पूर्ण केले आहे.

श्री. विजयजी यांच्या या पवित्र कार्याचा व विचाराचा भाविकांनी, ज्ञानेश्वरीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांनी, अभ्यासूंनी खूप आदर करावा. सर्वांना समजेल, सहज कळेल अशी सोपी भाषा त्यांनी ज्ञानेश्वरीवर प्रतिज्ञानेश्वरी रचतांना वापरली आहे. या मागील त्यांचा पवित्र उद्देश हाच आहे, की संत ज्ञानेश्वर महाराजांची ज्ञानेश्वरी सर्व लोकांना कळावी. म्हणून पारंपारिक संकोचित वृत्तीचा परित्याग करून व्यापक विचाराच्या दृष्टीतून या सोप्या भाषेतील ज्ञानेश्वरीकडे सर्व भाविकांनी व वारकरी संप्रदायातील सर्व संतांनी पाहावे अशी मी आशा करतो. विशेष म्हणजे वारकऱ्यासारखा न दिसणारा परंतु ह्रदयातून पूर्ण वारकरीच असणारा हा तत्त्वचिंतक मी अतिशय जवळून अनुभवलेला आहे. म्हणून त्यांच्या विचाराचा व या आध्यात्मिक कार्याचा खूप आदर करतो . त्यांच्या या कार्याला माझे अनंतानंत शुभ आशीर्वाद. पुन्हा त्यांच्या हातून अशीच वाङ्मयीन सेवा घडत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

परमहितैषी आचार्य स्वामी हरिचैतन्य
गुरुदेव आश्रम, पळसखेड (स.), बुलढाणा

---

आजच्या मराठी भाषेत ओवीबद्ध झालेली अशी ही ओवीरचना भावार्थ ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रकटली आहे ती ईश्वरी कृपाच होय. मनुष्याची बुद्धी हे काम नक्कीच करू शकत नाही. हा भावार्थ वाचताना मनाची पकड तर घेतोच पण वाचता वाचता गोडी अधिकच वाढत जाते व मनाचा वेगळ्या विश्वात प्रवेश होतो. आत्मज्ञानासंबंधीचे सविस्तर निरूपण पुन्हा एकदा सुलभ स्वरूपात जनसामान्यांच्या भाषेत ज्ञानेश्वरीची मूळ गोडी घेऊन प्रकटले आहे.

ह.भ.प.संजय महाराज पाचपोर
गुप्तेश्वर संस्थान, मु.पो.शिर्ला, ता.खामगांव जि.बुलढाणा

---

'चांगदेव पासष्टी' व 'अमृतानुभव' आणि 'भावार्थ गीता' या दोन ग्रंथांनंतर आता 'भावार्थ ज्ञानेश्वरी' हा ओवीबद्ध ग्रंथ घेऊन श्री.विजय बळवंत पांढरे वाचकांच्या भेटीला येत आहेत. इथे वाचकांच्या भेटीला हा शब्द मी वापरला पण श्री.विजय बळवंत पांढरे यांच्या या लेखनाचा वाचक हा `टाइमपास` करण्यासाठी छापील माकुरावरून नजर फिरवणारा वाचक नव्हे ! याच्या चित्ताला आध्यात्मिक तळमळीचा, ओझरता का होईना स्पर्श झालेला आहे असा हा वाचक आहे. साधनेच्या मार्गावर पाऊल टाकू इच्छिणारा किंवा ज्याने पाऊल टाकले आहे असा हा वाचक आहे. असा वाचक जेव्हा भगवद्गीता, चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरील लेखन वाचतो तेव्हा त्याचे वाचन ही त्याच्या आंतरिक साधनेची वाटचाल असते. श्री.विजय बळवंत पांढरे ज्ञानेश्वरीचे साधक, अभ्यासक आहेत; पंडित अभ्यासक नव्हेत. त्यामुळे त्यांच्या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाला साधनेचा सुगंध आहे. सर्वसामान्य माणसापर्यंत सुलभीकरणाच्या मार्गाने ज्ञानेश्वरी पोचवण्याचा श्री.विजय बळवंत पांढरे यांचा हा प्रयत्न त्यांच्या हेतूची पूर्तता करणाच्या दृष्टीने यशस्वी ठरेल असा मला विश्वास वाटतो.

कविवर्य मंगेश पांडगावकर,
साईप्रसाद, सायन(प), मुंबई

---

ज्ञानेश्वरी ही मराठी भाषेत असली, तरी आमच्या मराठी भाषिकाला ती समजणे अवघड जाते हे खरे. कारण ज्ञानेश्वरीत यादवकाळात प्रचलित असलेले शब्द व विधानांची वळणे आहेत. विजय पांढरे यांनी ज्ञानेश्वरीचे हृदगत नीट सांभाळून प्रचलित मराठीत आणले आहे व ते बरेच सुबोध झाले आहे. भाषा-भाषांमधील प्रवास चांगल्या वाटाड्याच्या सहाय्याने अर्थाला निर्वेधपणे करता येतो.

श्री. पांढरे यांचे निर्वाहाचे क्षेत्र वेगळे आहे, तरी ज्ञानेश्वरांनी त्यांना वेड लावले. त्यामुळे रूपांतराच्या निमित्ताने एका लोकोत्तर साक्षात्कारी संतांच्या योगयुक्त वाणीच्या मनोमय सान्निध्यात त्यांना काही काळ घालवता आला. त्यामुळे उरलेल्या आयुष्याची पाऊलवाट सोन्याची झाल्याची कृतकृत्यता त्यांना मिळेल. संतांचा एवढा प्रसादही पूर्वसंचितामुळेच लाभू शकतो, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

मा. राम शेवाळकर, नागपूर

esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान®

www.esahity.com

## श्री विजय पांढरे यांची ओळख

श्री विजय बळवंत पांढरे (BE Civil) हे मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (M.E.R.I.), नाशिक येथे अधीक्षक अभियंता व सहसंचालक या पदावर कार्यरत असून त्यांनी चांगदेव पासष्टी, अमृतानुभव, भगवद्गीता व ज्ञानेश्वरी या चारही ग्रंथांचे आधुनिक प्रचलीत मराठीत सुलभ असे ओवीबद्ध रुपांतर केले अनुवाद केले आहेत. सदर ओवीबद्ध ग्रंथ ऑडिओ स्वरुपात व छापील स्वरूपातही उपलब्ध आहेत. त्यांनी नुकतीच अष्टावक्रगीताही आजच्या मराठीत ओवीबद्ध केली आहे. अध्यात्म हा चित्तस्थिरीकरणाचा , चित्तशुद्धीचा व चित्तलयाचा विषय असल्याचे या सर्व ग्रंथातून त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे. सर्व धर्म, सर्व मार्ग, सर्व साधना, सर्व गुरू, सर्व ग्रंथ या सगळयांचे सार तेच आहे. सर्वांनी असा शास्त्रीय दृष्टीकोन बाळगल्यास आत्मज्ञान दूर नाही असे ते स्वानुभवावर सांगतात. (दूरभाष : ९८२२९९२५७८)

## ई साहित्य प्रतिष्ठान

२००८ पासून मराठी ई पुस्तकांच्या निर्मितीत आणि वितरणात महत्त्वाचा वाटा ई साहित्य प्रतिष्ठानने उचलला आहे. आजवर २०० हून अधिक ई पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या ई साहित्य प्रतिष्ठानचे आजघडीला सव्वा लाख वाचक आहेत. या सर्व वाचकांपर्यंत ही ई पुस्तके विनामूल्य वितरित केली जातात.


विनामूल्य ई पुस्तकांसाठी मेल पाठवा : esahity@gmail.com

अधिक माहिती साठी भेट द्या : www.esahity.com

फ़ोन : ९८६९६७४८२०